




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २४९ ●सोमवार,दि.०८ डिसेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955









## सरकारच्या चहापानावर बहिष्कार

### हिवाळी अधिवेशनापूर्वी विरोधकांचा सरकारवर घणाघाती आरोप

**नागपूर । प्रतिनिधी**

१९८० मध्ये भाजपाचे १४ आमदार होते, १९७५ मध्ये १६ आमदार होते तेव्हाही विरोधी पक्षनेते देण्यात आले होते. परंतु आताच्या सरकारला विरोधकांची भीती वाटते का? विरोधी पक्षनेतेपद रिक्त ठेऊन चहापानाला बोलावत असतील तर त्यावर विरोधकांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहिती काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. नागपूर हिवाळी अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात होत आहे. त्याआधी सरकारकडून विरोधकांना चहापानाचं आमंत्रण देण्यात आले. त्यावर विरोधकांनी बहिष्कार टाकला आहे. नागपूरात विरोधकांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत महायुती सरकारवर निशाणा साधला. विजय वडेट्टीवार, भास्कर जाधव यांनी ही पत्रकार परिषद घेतली.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी करू असं आश्वासन महायुतीने दिले होते. मात्र वारंवार सरकारकडून तारीख पे तारीख देण्याचं काम करण्यात येत आहे. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जात आहे. केंद्राकडे अतिवृष्टीसाठी प्रस्ताव पाठवला नाही असं पुढे आले. राज्याला केंद्राकडून अद्याप कुठलीही मदत मिळाली नाही. राज्यात शेतकऱ्यांचा अवमान करण्यासाठी महायुती नेत्यांची चढाओढ सुरू आहे. अजित पवार असतील राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांविरोधी विधाने केली. राज्यातील तिजोरी खाली झाली आहे. ९ लाखाहून अधिक कर्ज राज्यावर आहे. उत्पन्नाचा मोठा वाटा कर्ज परतफेडीवर जात आहे. महसूल तूट वाढली आहे. निधी वाटपात मोठ्या प्रमाणात असमानता होत आहे असा आरोप त्यांनी केला.

तसेच राज्य दिवाळखोरीला निघाले आहे. मोठ्या शहरात निधी वळवला जातो. छोट्या शहरांना विकासापासून वंचित ठेवले जाते. विदर्भाकडेही दुर्लक्ष केले जात आहे. सरकार पुरवणी मागण्यात मोठ्या रक्कमा सांगत आहेत. लाडकी बहीण म्हणून पाठ थोपवणाऱ्या ▶ उर्वरित पान २ वर

## नाशिकच्या सप्तश्रृंगी गडावर जाणाऱ्या घाटात मोठा अपघात

### संरक्षण कठडा तोडून इनोव्हा घाटात कोसळली, ५ जणांचा मृत्यू झाल्याची भीती



**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिकमधून मोठी बातमी समोर येत आहे. नाशिकच्या प्रसिद्ध अशा सप्तश्रृंगी देवीच्या गडाच्या दिशेला जाणाऱ्या घाटात एका कारचा भीषण अपघात झाला आहे. या कारमध्ये सर्व भाविक होते. सर्व भाविक हे सप्तश्रृंगी देवीच्या गडावरुन दर्शन घेऊन परतत होते. यावेळी घाटात त्यांच्या कारचा भीषण अपघात झाला. ही कार थेट खोल दरीत कोसळली आहे. त्यामुळे ५ जणांचा मृत्यू झाल्याची भीती वर्तवली जात आहे. या कारमध्ये नेमकं कोण होतं आणि ते सुरक्षित आहेत का? याची माहिती अद्याप समजू शकलेली नाही. पण या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

सप्तश्रृंगी देवीच्या दर्शनासाठी दर रविवारी भाविकांची गर्दी होत असते. भाविक मनोभावे देवीच्या दर्शनासाठी इथे येत असतात. याशिवाय शनिवार आणि रविवारी सुट्टी असल्याने सप्तश्रृंगी गडावर भाविकांची गर्दी असते. अशाचप्रकारे पाच भाविक हे इनोव्हा कारने देवीच्या दर्शनाला गेले होते. ते देवीचं दर्शन घेऊन परतत असताना घाटात मोठी दुर्घटना घडल्याची माहिती आहे. संरक्षण कठडा तोडून इनोव्हा कार घाटात कोसळल्याची माहिती आहे. ▶ उर्वरित पान २ वर

## मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्रासाठी २ मोठे निर्णय, मिलिंद साठे राज्याचे नवे महाधिवक्ता, शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा प्रस्ताव मंजूर



**● शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणखी एक मोठा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. हा निर्णय राज्यातील शेतकऱ्यांसाठी घेण्यात आल्याची माहिती आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालं होतं. या शेतकऱ्यांना आता सरकारकडून मोठी मदत केली जाणार असल्याची माहिती आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी जी उर्वरित रक्कम देणं बाकी आहे ती देण्याबाबतच्या प्रस्तावाला सरकारकडून मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे १० लाख ६७ शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**नागपूर । प्रतिनिधी**

विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून (८ डिसेंबर) सुरुवात होणार आहे. हिवाळी अधिवेशाच्या पूर्वसंध्येला सरकारचा आज चहापानाचा कार्यक्रम पार पडला. या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. विरोधकांनी पत्रकार परिषद घेत अधिवेशनात पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत, शेतकरी कर्जमाफीसह विरोधी पक्षनेता पद निवडीबाबतच्या मुद्द्यावरुन सरकारला घेरणार असल्याचा इशारा दिला. त्यानंतर राज्य सरकारचा चहापानाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमानंतर राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रासाठी दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. ▶ उर्वरित पान २ वर

## 'शाळा बंद' आंदोलन; लाखभर शिक्षकांवर सरकारची कारवाई ठरली!




**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील अनुदानित शाळांमधील शिक्षकांनी ५ डिसेंबरला राज्यव्यापी पुकारलेल्या शाळा बंद आंदोलनात सहभागी झालेल्या प्राथमिकच्या २१,४७७ आणि माध्यमिक शाळेतील २५३९ शाळेतील एकूण ९६ हजार ८०० शिक्षक शिक्षकांवर शालेय शिक्षण विभागाकडून एक दिवसाची वेतन कापण्याची कारवाई केली जाणार आहे. ही कारवाई शालेय शिक्षण विभागाच्या शिक्षण निरीक्षक आणि शिक्षणाधिकारी कार्यालय स्तरावरून केली जाणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने काढलेला १५ मार्च २०२४ चा सरकारचा निर्णय रद्द करावा आणि ▶ उर्वरित पान २ वर

## मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेचा विक्रम, गिनीज बुकात नोंद

### सौर ऊर्जेच्या वापरामुळे विजेच्या दरात कपात करणार: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

देशात महाराष्ट्र हे सौर ऊर्जेचा शेतीत सर्वाधिक वापर करणारे राज्य ठरले आहे. शेतकऱ्यांसाठी फिडर सौर ऊर्जेवर आणून स्वतंत्र १६ हजार मेगा वाट वीज निर्मिती करु. त्यामुळे अन्य वापरातील विजेच्या दरात आपण दरवर्षी ३ टक्के कपात करुन ग्राहकांना स्वस्त वीज देऊ शकतो,असे आश्वसन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे बोलतांना केले.



एका महिन्यात ४५ हजार ९११ कृषी पंप- 'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेत महाराष्ट्राने विश्वविक्रम केला आहे. महावितरणने एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषीपंप स्थापित करण्याचा उच्चांक गाठला. या विक्रमाची गिनिज बुकमध्ये यशस्वी नोंद झाली. गिनीज बुकतर्फे विश्वविक्रम प्रमाणपत्र प्रदान सोहळा आज छत्रपती संभाजीनगरच्या शेंद्रा एमआयडीसीमध्ये ऑरिक सिटी मैदानावर पार पडला. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. या विश्वविक्रमाची घोषणा करण्यासाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे कार्ल सॅबेले हे ही यावेळी उपस्थित होते.

या सोहळ्यास राज्याचे इमाव बहुजन कल्याण व अपारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे,राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, विधान परिषद ▶ उर्वरित पान २ वर

## जिरेवाडी सोमेश्वर मंदिरात चोरी करणाऱ्या पाच जणांना अटक

**बीड । प्रतिनिधी**

ग्रामीण पोलिसांनी जिरेवाडी येथील सोमेश्वर संस्थानाच्या मंदिरात झालेल्या चोरीचा छडा लावत पाच आरोपींच्या टोळीला अटक केली आहे. आरोपींकडून चोरीचा काही ऐवज आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जम करण्यात आली आहे. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री साडेदहा वाजल्यापासून ते २६ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे पाच वाजण्याच्या दरम्यान जिरेवाडी (तालुका परळी वैजीनाथ, जिल्हा बीड) येथील सोनेश्वर संस्थानाच्या मंदिराच्या सभागृहाचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. त्यानंतर मंदिरातील गाभाऱ्यातील दानपेटीचे कुलूप तोडून अंदाजे तीस हजार रुपये रोख रक्कम, चांदीची चंद्रकोर आणि एक ग्रॅम वजनाचे सोन्याचे टाक बोरून नेले होते. या धार्मिक स्थळातील चोरीमुळे भाविकांमध्ये तीव्र संताप आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. ▶ उर्वरित पान २ वर

## गोव्याच्या ज्या नाइट क्लबमध्ये २५ जणांचा होरपळून मृत्यू, त्या बर्च बाय रोमियो क्लबची खासियत काय?

**गोवा । प्रतिनिधी**

गोव्याच्या एका नाइट क्लबमध्ये रात्री उशिरा भीषण आग लागली. यामध्ये २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अग्नितांडवाच्या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. दुर्घटनेतील मृतांना आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे.



नॉर्थ गोव्याच्या अरपोरा येथील बर्च बाय रोमियो लेन रेस्टॉरंटमध्ये रात्री उशिरा भीषण आग लागली. या दुर्घटनेत आतापर्यंत २५ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये बहुतांश रेस्टॉरंटचे कर्मचारी आहेत. कारण ही दुर्घटना किचन जवळ झाली. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतांमध्ये चार पर्यटक आहेत. यात तीन महिला आहेत. नाइट क्लबने अग्नि सुरक्षा नियमांचं पालन केलं नव्हतं असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. सीएमनी स्वत: घटनास्थळी जाऊन आढावा घेतला. सिलिंडर स्फोटामुळे ही दुर्घटना घडल्याची शक्यता आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या ▶ उर्वरित पान २ वर

## प्रेमाने घात केला, आणखी एका हत्येने महाराष्ट्र हादरला; १९ वर्षीय सुहासला रस्त्यातून उचललं

**इचलकरंजी । प्रतिनिधी**

इचलकरंजीच्या १९ वर्षीय सुहास सतीश थोरात या तरुणाचे अपहरण करून कर्नाटक सीमेवर नेऊन निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य संशयित ओंकार अमर शिंदे, ओंकार रमेश कुंभार आणि एका अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले आहे.



सुहास थोरात हा भोनेमाळ परिसरात राहत होता. शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास, मोटरसायकल दुरुस्तीच्या बहाण्याने तिघांनी त्याचे अपहरण केले. सुहास कामावरून घरी जेवायला आला असता, त्याला लिगाडे मळा परिसरातून जबरदस्तीने निपाणी जवळील देवचंद कॉलेजमागे नेण्यात आले. आरोपी तरुणांनी कोयत्याने डोके, हात आणि तोंडावर वार करून सुहासची निर्घृण हत्या करण्यात आली आणि मृतदेह जवळच्या ओढ्यात ▶ उर्वरित पान २ वर

## सक्षम ताटेच्या कुटुंबियांच्या मदतीसाठी समाज कल्याण विभाग सरसावले

### एका सदस्याला शासकीय नोकरी अन् ८ लाखांची मदत जाहीर



**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेडमध्ये घडलेल्या सक्षम ताटे या तरुणाच्या खून प्रकरणात पोलिसांनी आत्तापर्यंत आठ जणांना ताब्यात घेतलं आहे. २७ नोव्हेंबर रोजी सक्षम ताटे याची प्रेयसी आचल मामीडवार कुटूंबियांकडून सक्षम याचा खून करण्यात आला होता. या प्रकरणातील एकूण आरोपींची संख्या आता आठवरती गेली आहे. नांदेडमधील इतवारा भागातील संघसेन नगर येथील २० वर्षीय सक्षम ताटे या तरुणाचा सिद्धनाथपुरी भागातील १९ वर्षीय आचल मामीडवार हिच्यासोबत प्रेमसंबंध होते. मागील तीन वर्षापासून ते एकमेकांसोबत होते. या दोघांच्या प्रेम प्रकरणाला मुलीच्या घरच्याचा विरोध होता. याच कारणावरून २७ नोव्हेबर रोजी मिलिंद नगर परिसरात सक्षम ताटेची प्रेयसीच्या वडीलांनी आणि भावांनी गोळ्या घालून आणि फरशीने डोक्यात घालून निर्घृण हत्या करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करत आचलची आई जयश्री गजानन मामीलवाड, वडील गजानन बालाजी मामीलवाड, भाऊ साहिल गजानन मामीलवाड, सोमेश सुभाष लखे, वेदांश अशोक कुंदेकर उर्फ कुलदेवकर, अमन देविदास शिरसे, आणि मुलीच्या अन्य एका अल्पवयीन भावाला यापूर्वी अटक केली. या प्रकरणी आता मोठी अपडेट समोर आली आहे

समाज कल्याण विभागाकडून पीडित सक्षम ताटेच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्यात येत आहे. समाज कल्याण विभागाकडून एकूण ८ लाख २५ हजार रुपये आर्थिक मदत देण्यात येत आहे. यापैकी ४ लाख १२ हजार ५०० रुपये पहिला हप्ता पीडित कुटुंबियांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आला आहे. तर उर्वरित रक्कम न्यायालयात चार्ज सीट दाखल झाल्यानंतर देण्यात येणार असल्याची माहिती समाज कल्याण विभागाकडून देण्यात आली आहे. आर्थिक मदती शिवाय कुटुंबियांच्या एका सदस्याला शासकीय नोकरी देण्यात येणार आहे.




# बोधी दिन: मानवजागृती आणि सामाजिक परिवर्तनाचा मार्ग

जगाच्या इतिहासात काही दिवस फक्त प्रसंग म्हणून नाही तर बदलांचे बिंदू म्हणून ओळखले जातात. अशा दिवसांपैकी एक म्हणजे ८ डिसेंबर बोधी दिन होय. हा दिवस केवळ बौद्ध धर्मीयांसाठी अध्यात्मिक महत्त्वाचा नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी विचार, विवेक, करुणा आणि सामाजिक न्यायाची स्मृती जागवणारा दिवस आहे. कारण याच दिवशी राजकुमार सिद्धार्थांनी बोधी वृक्षाखाली ध्यानधारणा करत करत जीवनातील अनंत दुःख, विषमता, युद्ध, सत्ता, लोभ व अन्यायाच्या संकटांचे मूळ शोधत अखेर ज्ञानप्राप्ती केली आणि ते गौतम बुद्ध झाले. म्हणूनच बोधी दिन ही केवळ धार्मिक घटना नाही, तर मानवजातीच्या सामाजिक, नैतिक, तत्त्वज्ञानिक आणि मानवतावादी प्रवासातील एक अविस्मरणीय मैलाचा दगड आहे.

मानव समाजाच्या उत्क्रांतीत अनेकदा युद्धांनी, एकाधिकारशाहीने, साम्राज्यवादाने आणि सामाजिक जात-धर्म-वंशभेदांनी दहशत निर्माण केली. आपल्याला प्रश्न असा पडतो की मानवाला मानव बनविणारा मार्ग कोणता? शक्तीचा की प्रज्ञेचा? तर बुद्धांचे उत्तर होते की शांततेचा, नैतिकतेचा, करुणेचा, समानतेचा आणि मध्यममार्गाचा. म्हणूनच समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता बोधी दिन हा केवळ आध्यात्मिक ज्ञानाचा उत्सव नाही तर मानवी समाजाला न्याय्य, समतामूलक आणि नैतिक दिशेने प्रवास करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.

इतिहासात पाहिल्यास, ज्ञानप्राप्तीपूर्वीचा सिद्धार्थ हा केवळ एखाद्या राज्यातील राजकुमार नव्हता; तो एक संवेदनशील निरीक्षक होता. मृत्यू, रोग, वृध्दत्व आणि दारिद्र्य या चार सत्यांनी त्याला हादरवले. समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून हे प्रश्न आजही तेवढेच जिवंत आहेत. जग प्रगत झाले असे म्हणवले जाते, पण भूक, युद्ध, सामाजिक असमानता, मानसिक तणाव, जातीय संघर्ष, धार्मिक कट्टरता आणि उपभोगवाद-नफा-आधारित जीवनपद्धतीने मानवाला पुन्हा असहाय्य बनवले आहे. अशा काळात बोधी दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

गौतम बुद्धांच्या शिकवणीत धम्म हा कर्तव्य, नैतिकता आणि विवेक होता. त्यामुळे धम्म म्हणजे कर्मकांड, जप-तप, पुरोहिती किंवा अंधश्रद्धा नव्हे, तर समाजाला समता आणि न्याय मिळवून देणारी प्रेरणा. म्हणूनच बुद्ध म्हणतात की अप्प दीपो भव म्हणजेच स्वतःचा दीप स्वतः बना. समाजशास्त्रीय अर्थ असा की, प्रत्येक व्यक्तीने आत्मबोध, विचारमंथन आणि नैतिक धैर्य विकसित केले पाहिजे; कारण परिवर्तन हे बाहेरून लादले जाणारे नसते तर ते अंतर्मनातून जन्मते.

बोधी दिन मानव स्वभावातील तीन प्रमुख प्रवृत्तींकडे निर्देश करतो, त्यामध्ये पहिली प्रवृत्ती म्हणजे लोभ म्हणजेच अत्यंत मिळवण्याची इच्छा होय. आधुनिक समाजशास्त्र सांगते की बाजारव्यवस्था भौतिक समाधान देऊ शकते, पण ती आध्यात्मिक आणि भावनिक शांती देऊ शकत नाही. दुसरी प्रवृत्ती आहे द्वेष होय. आजही आपण पाहतो की राजकारणात, धर्मांमध्ये, समाजवर्गांमध्ये, डिजिटल माध्यमात आणि राष्ट्रांमध्ये लोकांमध्ये मतभेदांपेक्षा तिरस्कार वाढत आहे. बुद्ध म्हणतात की द्वेषाने द्वेष संपत नाही; प्रेमानेच तो संपतो. तिसरी प्रवृत्ती म्हणजे अज्ञान होय. दडपशाही, भेदभाव, हिंसा आणि कट्टरतेचा मूलाधार. समाजातील अन्याय, जातीय दमन, पितृसत्ता, वर्ण-जातिवाद, आर्थिक शोषण, पर्यावरणाचा विनाश यांची मुळे मानवी अज्ञानात आणि अविचारी कृतीत आहेत. बोधी म्हणजे हे अज्ञान दूर करण्याची प्रक्रिया होय.

म्हणूनच बोधी दिन मानवाला स्मरण करून देतो की ज्ञान म्हणजे माहिती नव्हे, तर जागृती. आज इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, जागतिकीकरण आणि डिजिटल संपर्कामुळे माहितीचे जग फुलले आहे; पण शांती, श्रद्धा, मानवता आणि संयम कोठेतरी हरवले आहेत. म्हणूनच बुद्धांचे तत्त्वज्ञान समाजशास्त्रीय प्रश्न विचारते की आपण अधिक प्रगत झालो आहोत, की फक्त अधिक गुंतागुंतीचे आणि अस्थिर झालोआहोत?

बोधी दिन आपल्याला न्यायाच्या, समतेच्या, संवादाच्या आणि अहिंसेच्या नव्या मूल्यांना स्वीकारण्याचे आह्वान देतो. बुद्धांनी लोकशाहीचा पाया मांडताना संघ, विचारस्वातंत्र्य, मतभेदांचा सन्मान आणि सार्वत्रिक करुणा या तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवले. आजच्या लोकशाही व्यवस्थेत या मूल्यांची पुन्हा गरज भासते. कारण विचारविनिमयाऐवजी संघर्ष, सहिष्णुतेऐवजी कट्टरता आणि मानवी हक्कांऐवजी नियंत्रणवाद वाढताना दिसतो आहे. म्हणूनच बोधी दिन आपल्याला सांगतो की समाजाची उभारणी वर्चस्वावर नाही, तर सहजीवनावर होते. याच संदर्भात बुद्धांनी समाजातील सर्वात उपेक्षित घटक म्हणजेच महिला, शूद्र, वंचित, संघर्षग्रस्त आणि पीडित घटकांमध्ये मानवी समानतेचे तत्त्व पहिल्यांदा प्रत्यक्षात आणले. समाजातील प्रत्येक जण जात, लिंग, वर्ग, धर्म, व्यवसाय किंवा जन्माच्या आधारे समान आहे हे तत्त्व सामाजिक न्यायासाठी आजही महत्त्वाचे आहे.

बोधी दिन हा वर्तमानातील मानसिक आरोग्याच्या संकटांनाही उत्तर देतो. आधुनिक जीवनशैली वेगवान, स्पर्धात्मक, तणावग्रस्त आणि यांत्रिक झाली आहे. बुद्धांचे ध्यान, सम्यक स्मृती, मन:शांतता आणि प्रज्ञेचे तत्त्व आज जागतिक मानसिक आरोग्य चळवळीचे आधार आहे. जागरूकता, ध्यान, भावनिक बुद्धिमत्ता (ाळपवर्षीश्रपर्शीी, ाशवळींरींळेप, शोींळेपरश्र ळपींशश्रश्रळसशपलश) यांचा उगम हा बोधीच्या तत्त्वज्ञानातच आहे.

बोधी दिन आपल्याला पर्यावरणीय जाणीव देखील शिकवतो. बुद्धांनी निसर्गासोबत संघर्ष नव्हे, तर सह-अस्तित्व सुचवले. आज पृथ्वीला हवामान बदल, प्रदूषण, जैवविविधतेचा ऱ्हास, नद्यांचा मृत्यू, जंगलांचा विनाश आणि प्राणी-मानव संघर्ष या समस्या भेडसावत आहेत. अशावेळी सर्व प्राणी माझेच आहेत हा बुद्धांचा संदेश आजच्या पर्यावरणीय नैतिकतेचा मूळ पाया ठरतो. याच अर्थाने बोधी दिन हा केवळ स्मरणदिन नाही तर तो सततच्या आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. बुद्धांनी सांगितले की मनुष्याचे दुःख भाग्याने नव्हे, तर त्याच्या विचारांनी आणि कृतींनी निर्माण होते. म्हणून बदल हवा असेल तर तो आतून सुरू झाला पाहिजे.आजच्या काळात बोधी दिनाचा संदेश जगभराला एका नव्या सामाजिक कराराची गरज सांगतो तो संदेश म्हणजे, जिथे धर्म हिंसा नव्हे, संवाद निर्माण करतो. जिथे तंत्रज्ञान मानवतेची परिपूर्ती करतो. जिथे समीक्षाशील विचार आणि करुणा एकत्र येतात. जिथे समाज फक्त विकसित नसतो, तर मनानेही सभ्य असतो. या अर्थाने बोधी ही स्वतःमध्ये एक अंतरिक क्रांती आहे. ती जीवनाच्या संघर्षांना टाळणारी नाही, तर त्या संघर्षांचे स्वरूप समजून शांततेने त्यावर उत्तर शोधणारी आहे. बोधी दिन ही एक जाणीव आहे की जग बदलण्यासाठी पहिले पाऊल म्हणजे स्वतःला बदलणे होय.

आज ८ डिसेंबरच्या या दिवशी आपण सर्वांनी स्वतःला विचारावे की आपण जागृत आहोत की फक्त जागे आहोत?

कारण बुद्धांच्या मते, मनुष्य जन्माला येतो, पण मानव बनण्यासाठी त्याला विवेक, करुणा, दया आणि समता अंगीकारावी लागते. बोधी दिन आपल्याला एकच संदेश देतो की, शांती ही बाह्य मिळकत नाही; ती अंतर्मनातून उगम पावलेली प्रज्ञा आहे. आणि हीच प्रज्ञा समाजाला न्याय्य, समतामूलक, शोषणमुक्त आणि सौहार्दपूर्ण बनवू शकते. म्हणून आजच्या या पवित्र दिवशी आपण फक्त स्मरण नव्हे तर अनुकरण करण्याचा संकल्प करूया. कारण जेव्हा प्रत्येक मानव बोधी होईल, तेव्हा जगात खऱ्या अर्थाने सुंदरता, शांती आणि मानवता नांदेल.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

◆ पान १ वरून पुढे...

## सरकारच्या चहापानावर...

बहिणींच्या सुरक्षेकडे सरकारचे लक्ष नाही. महिलांवरील अत्याचार वाढले आहे. दररोज २४ मुलींवर अत्याचार, छळाचे गुन्हे नोंदवले आहे. लहान मुलींवरील अत्याचारात महाराष्ट्र नंबर एकवर आहे. २०२१ मध्ये १०४२८ गुन्हे नोंदवले गेले. २०२२ मध्ये ८३५५, २०२३ मध्ये ९५७० आणि २०२५ मध्ये आतापर्यंत २ हजाराहून अधिक गुन्हे नोंदवले गेलेत. महिला सुरक्षेत सरकार अपयशी ठरले आहे. संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी अशा हत्या झाल्या आहेत. देशमुख प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे अजूनही बेपत्ता आहे असा आरोप विरोधकांनी केला. दरम्यान, मागच्या अधिवेशनापासून आतापर्यंत विदर्भात ७५ लोकांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला. २०२० ते २०२४ या कालावधीत २१८ मृत्यूची नोंद आहे. २०२५ मध्ये नाशिक, पुणे येथे बिबट्यांच्या हल्ल्यात हजारो नागरीक जखमी झाले. सरकारकडून कुठल्याही उपाययोजना केल्या जात नाही. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कंत्राटदारांच्या आत्महत्या, बेरोजगार युवक आत्महत्या करतायेत. ११ वर्षाच्या भाजपा कालावधीत विदर्भात रोजगारासाठी युवकांना का भटकावे लागते याचे उत्तर सरकारकडे नाही. सत्तेचा उपयोग कुणासाठी आहे हा प्रश्न जनतेला पडला आहे. राज्यात ७ लाख कोटींच्या जमिनी अदानींच्या घशात घातल्या आहेत. कवडीमोल भावात या जमिनी दिल्या गेल्या. पुण्यातही सरकारी जमीन हडपण्याचा प्रयत्न केला अशा विविध आरोपांनी विरोधकांनी सरकारला घेरले आहे.

## नाशिकच्या सप्तश्रृंगी...

या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाल्याची भीती वर्तवली जात आहे. अपघातग्रस्थांना वाचवण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. स्थानिक ग्रामस्थ आणि प्रशासनाकडून बचाव कार्य सुरु करण्यात आली आहे. पण दरी खोल असल्याने बचावकार्यात अडथळा येत असल्याची माहिती आहे. दरम्यान, या घटनेनंतर बचावकार्याचा एक व्हिडीओ समोर आला आहे. या व्हिडीओत काही लोकं हे रस्त्यावरुन उभे राहून दरीच्या दिशेला पाहताना दिसत आहेत. खोल दरीत जिथे कार कोसळली आहे तिथे पाच-सहा जण पोहोचलेले दिसत आहेत. त्यांच्याकडून अडकलेली गाडी बाजूला करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. या घटनेतील अपघाग्रस्तांना जीव वाचावा यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. तसेच कारदेखील बाहेर काढण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत. अपघात नेमका कसा घडला? त्याची माहिती अद्याप समजू शकलेली नाही. गाडीचा ब्रेक फेल झाला की भरधाव वेगामुळे चालकाचं गाडीवरील नियंत्रण सुटलं की तीव्र वळणावर चालकाचं गाडीवरील नियंत्रण सुटलं? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या घटनेबाबत प्रशासनाकडून काय माहिती दिली जाते? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## मंत्रिमंडळ बैठकीत....

यापैकी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे राज्याच्या नवे महाधिवक्तांची निवड करण्यात आली आहे. तर दुसरा निर्णय हा शेतकऱ्यांसाठी घेण्यात आला आहे. राज्याचे महाधिवक्ता म्हणून मिलिंद साठे यांची निवड करण्यात आली आहे. वीरेंद्र सराफ यांनी काही महिन्यांपूर्वी महाधिवक्ता पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली होती. पण महाधिवक्तापदी नव्या विधीतज्ज्ञांची निवड होत नाही तोपर्यंत काही महिने त्यांना जबाबदारी सांभाळण्याची विनंती सरकारकडून करण्यात आली होती. त्यानुसार वीरेंद्र सराफ हे महाधिवक्ता पदाची जबाबदारी पार पाडत होते. दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपुरात आज पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिलिंद साठे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. मिलिंद साठे यांचा विधी विभागात दांडगा अनुभव आहे. त्यामुळे राज्याला त्यांच्या अनुभवाचा चांगला फायदा होईल अशी भावना व्यक्त होत आहे.

मुंबई उच्च न्यायालयातील प्रख्यात वरिष्ठ वकील म्हणून ओळख असलेले डॉ. मिलिदं साठे हे कायद्यावरील सखोल अभ्यास, कायदेशीर प्रक्रियेवरील प्रभुत्व यासाठी ओळखले जातात. याखेरीज त्यांनी मुंबई हायकोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. त्यांना विज्ञान, कला, वित्त व व्यवस्थापन या विविध क्षेत्रांतील जाण असल्याने त्यांची विविध विषयांची कायदेशीर मांडणी अधिक व्यापक असल्याचे सांगितले जाते. जानेवारी २०२४ मध्ये कसबा पेठ मतदारसंघातील निधी गैरवापराच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने त्यांची न्यायालय मित्र म्हणून नियुक्ती केली होती. तसेच, विविध महत्त्वाच्या प्रकरणांत त्यांच्या तर्कशुद्ध व अभ्यासपूर्ण मांडणीची दखल न्यायमूर्तींसहित कायदेक्षेत्रात घेतली गेली आहे. राज्य सरकारने एकूण ६६३ कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी या प्रस्तावाच्या मंजुरीवर स्वाक्षरी केल्याची माहिती आहे. दरम्यान, राज्य सरकारने २० हजार १२८ कोटी १२ लाख रुपयांची मदत जाहीर केल होती. यापैकी जवळपास १९ हजार ४६३ कोटी रुपये देण्यात आले होते. काही रक्कम देणं बाकी होतं. त्यातील ६६३ कोटी रुपये देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. या निर्णयानंतर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात लवकरच मदत मिळणार आहे.

## 'शाळा बंद'...

शिक्षकांसाठी टीईटी अनिवार्यता केली जाऊ नये या प्रमुख मागणीसाठी राज्यातील विविध शिक्षक, मुख्याध्यापक आधी संघटनांकडून ५ डिसेंबर रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन करण्यात आले.यामध्ये पुणे, नाशिक, कोल्हापूर आदी विभागाचा अपवाद वगळता राज्यातील अर्ध्याहून अधिक शाळांनी या बंदमध्ये सहभाग नोंदवला नाही. त्यामुळे विविध संघटनांमधील मतभेद समोर आले तर दुसरीकडे संस्थाचालकांनीच या आंदोलनाकडे पाठ फिरवल्यामुळे राज्यभरात अनुदानितच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळा मोठ्या प्रमाणात सुरू राहिल्याचे चित्रही विभागाच्या अहवालात दिसून आले आहे. राज्यभरात ५ डिसेंबर रोजी पुकारलेल्या शाळा बंद आंदोलनात किती शिक्षक सहभागी झाले आणि किती शाळा बंद ठेवण्यात आल्या होत्या, या संदर्भातील अहवाल तयार केला असून यात माध्यमिकच्या २६,४९० शाळांपैकी केवळ २,५३९ शाळा बंद राहिल्या, तर या शाळांमध्ये कार्यरत असलेले २ लाख २४ हजार ३६६ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी केवळ १३, २१६ शिक्षकांनी शाळा बंद मध्ये सहभाग घेतल्याने राज्यातील माध्यमिकच्या शाळा प्रचंड मोठ्या प्रमाणात सुरू होत्या, असे चित्र विभागाच्या अहवालातून दिसून आले आहे.

शाळा बंदचा सर्वाधिक फटका प्राथमिकला- शाळा बंदचा सर्वात मोठा प्रभाव प्राथमिकच्या अनुदानित शाळांमध्ये दिसून आला. राज्यात असलेल्या ५७ हजार १३ शाळांपैकी २१ हजार ४७७ शाळा पूर्णपणे बंद राहिल्या. तर उर्वरित तब्बल ३५ हजार ५३६ शाळा सुरू होत्या. शाळा बंद असलेल्या शाळातील ८३ हजार ५८४ शिक्षक आपल्या शाळांवर गैरहजर राहून शाळा बंद आंदोलनात सहभागी झाले होते. प्राथमिक शाळांमधील शिक्षकांमध्ये सर्वाधिक २९२५ शिक्षक नाशिक जिल्ह्यात, तर त्या खालोखाल पुणे जिल्ह्यात २३४८ इतके गैरहजर राहिले. त्यानंतर धाराशिव जिल्ह्यात आचारसंहितेमुळे आंदोलन स्थगित करण्यात आले होते. त्यामुळे या जिल्ह्याला शाळा बंदचा कोणताही फटका पडला नाही. तर त्यासोबतच यवतमाळ बुलढाणा, नागपूर, मुंबई, ठाणे, भिवंडी, मीरा-भाईंदर आणि उल्हासनगर या परिसरामध्ये प्राथमिकच्या सर्व शाळा सुरू होत्या..

## मागेल त्याला...

सदस्य आ. संजय केणेकर, आ. अनुराधा चव्हाण, आ. नारायण कुचे,आ. प्रशांत बंब,आ. सुरेश धस, मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार तथा मित्राचे संचालक प्रवीण परदेशी, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जिवने, सहसचिव (ऊर्जा) नारायण कराड, स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), योगेश गडकरी (वाणिज्य), राजेंद्र पवार (मानव संसाधन), कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता पवनकुमार कछोट तसेच अभिनेते संदीप पाठक, योगेश शिरसाट आदी मान्यवर उपस्थित होते.

पंच कार्ल सॅबेले यांनी केली विक्रमाची घोषणा-सुरुवातीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते राज्यातील सौरकृषी पंपाचे डिजिटल लोकार्पण करुन त्यांनी लाभार्थी शेतकऱ्यांशी दुरदृष्य प्रणालीने संवाद साधला. त्यानंतर गिनीज बुक विक्रम नोंदचे निरीक्षक पंच कार्ल सॅबेले यांनी विक्रमाची घोषणा केली. त्यानंतर त्यांनी प्रमाणपत्र व मेडल मान्यवरांना प्रदान केले. सौर कृषी पंप योजनेसाठी अर्थसहाय्य करणाऱ्या -खखच् बँकेसोबतच्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. बँकेचे प्रत्युष मिश्रा व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

## जिरेवाडी सोमेश्वर...

या प्रकरणी सोमेश्वर संस्थान जिरेवाडी समितीचे उपाध्यक्ष पाटलोबा सिताराम मुंडे (वय ४५, रा. जिरेवाडी) यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरनं. ४९९/२०२५, कलम ३३१ (४), ३०५ (अ) बीएनएस प्रमाणे २६ नोव्हेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. बीड पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व चेतना तिडके तसेच उपविभागीय सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली परळी ग्रामीण पोलिसांनी या गुन्हयाचा बारकाईने तपास सुरू केला. गोपनीय बातमीदार आणि तपासातून पोलिसांनी वैभव विष्णु कोकरे (वय १९, रा. दाऊनापूर), बालाजी बबन चाटकर (वय २८, रा. समतानगर, अंबाजोगाई), महादेव बाबुराव माने (वय २२, रा. वानटाकळी), छगन नानाजी खैरमोडे (वय ३२, रा. रविवारपेठ, अंबाजोगाई) आणि ऋषीकेश दगडु माने (वय २२, रा. बानटाकळी) या पाच आरोपींना अटक केली. पोलिसांनी ४ डिसेंबर २०२५ रोजी या आरोपींना अटक करून त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल, चोरीस गेलेली चांदीची चंद्रकोर, सोन्याचे टाक आणि १७०० रुपये रोख रकम जप्त केली आहे. गुन्ह्यातील उर्वरित रोख रक्कम आणि चोरीसाठी वापरलेली हत्यारे जप्त करण्याच्या उद्देशाने पोलिसांनी आरोपींना परळी वैजीनाथ येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात हजर केले. न्यायालयाने आरोपींची ८ डिसेंबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजूर केली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निमोणे हे करत असून, पोलीस निरीक्षक एम. ए. सय्यद, सहायक पोलीस निरीक्षक मेंडके आणि पोलीस उपनिरीक्षक शेख यांच्यासह सफौ टोले, पोहवा हरगांवकर, परजने, पोअं घोडके, केदार, वाघमारे या पोलीस पथकाने गुन्हा उघडकीस आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## गोव्याच्या ज्या नाइट...

दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. गोव्याच्या अरपोरा येथे आग लागण्याची घटना खूप दु:खद आहे. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावलं, त्या सर्वांसोबत माझ्या संवेदना आहेत. जखमी लवकरात लवकर बरे होवोत असं पीएम मोदींनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. त्यांनी गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याशी चर्चा करुन परिस्थिती जाणून घेतली. राज्य सरकार पीडित लोकांना शक्य ती सर्व मदत करत आहे. पीएम मोदींनी गोव्याच्या अरपोरा येथील दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबाला पंतप्रधान मदत निधीतून २ लाख रुपये आणि जखमींना ५० हजाराची मदत जाहीर केली आहे.

गोवा पोलिसांनी काय माहिती दिली?- गोवा पोलिसांनुसार, नॉर्थ गोव्याच्या अरपोरा येथे रोमियो लेन जवळ असलेल्या बर्च बाय रोमियो लेन रेस्टॉरंटमध्ये भीषण आग लागली. यात २५ जणांचा मृत्यू झाला. यात चार पर्यटक आहेत. १४ स्टाफ मेंबर आहेत. ७ जणांची ओळख अजून पटलेली नाही. ६ लोक जखमी आहेत. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. आग लागण्याचं नेमकं कारण अजून समजू शकलेलं नाही. पोलीस आणि अग्निशमन दलाकडून तपास सुरु आहे. कायदेशीर कारवाई सुरु आहे.

या क्लबची खासियत काय?- बर्च बाय रोमियो लेन रेस्टॉरंट डान्स आणि नाइटक्लब आहे. इथे येणारे पर्यटक म्यूझिक आणि रात्री उशिरापर्यंत पार्टी एन्जॉय करायला येतात. भारतातील हा पहिला आयलँड क्लब (ऋळीीीं खीश्ररपव उश्रीील) आहे. म्हणजे चारही बाजुंनी पाण्याने घेरलेला आहे. आरपोरा नदीवर हा क्लब आहे. हा क्लब पाण्याच्या मधोमध असल्याने आयलँड सारखी फिलिंग येते. आपण कुठल्यातरी बेटावर आहोत असं वाटतं. हे नाइट क्लब रेस्टॉरंट आहे. हा क्लब संध्याकाळी ६ वाजता सुरु होऊन रात्री २ वाजता बंद होतो. कॉकटेलपासून खाण्या-पिण्याच्या सर्व गोष्टी इथे उपलब्ध होत्या.

## प्रेमाने घात...

फेकून देण्यात आला. सुहासचे वडील सतीश थोरात यांनी मुलगा घरी न परतल्याने आणि काळजी वाटू लागल्याने तातडीने शिवाजीनगर पोलिसांत अपहरणाची तक्रार दाखल केली. शनिवारी पहाटे मुरगूड पोलिसांना ओढ्यात एक मृतदेह सापडला. ओळख पटल्यानंतर शिवाजीनगर पोलिसांनी तातडीने कारवाई करत चंदूर रोडवरील शाहूनगरमधून पसार होण्याच्या तयारीत असलेल्या आरोपींना शिताफीने पकडले. दोन प्रौढ आरोपींना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, तर अल्पवयीन आरोपीला बालसुधारगृहात पाठवण्यात आले आहे. प्राथमिक तपासात वर्षभरापूर्वी सुहास आणि मुख्य संशयित ओंकार शिंदे यांच्यात वाद झाल्याचे समोर आले होते. त्यावेळी शिंदेने सुहासला चाकू दाखवून धमकी दिली होती. मात्र, आता तपासात सुहासचे ओंकार शिंदेच्या मेहुणीशी प्रेमसंबंध असल्याचा राग हेच खुनामागील मूळ कारण असल्याचे पोलिसांना धागेदोरे मिळाले आहेत. ओंकार शिंदे हा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याने खुनानंतर सोशल मीडियावर सूरज ढलता है, डुबता नहीं असा स्टेटस टाकला होता, ज्यामुळे पोलिसांचे लक्ष वेधले गेले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, मोबाइल लोकेशन, शस्त्र जप्ती आणि घटनास्थळ पंचनामा केला आहे. याप्रकरणी पोलिसांकडून अपहरण, खून आणि ट्रॉसिटीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अल्पवयीन आरोपी हा सुहासचा मित्र असून तो दहावीचा विद्यार्थी असल्याचे समोर आलं आहे. या घटनेने इचलकरंजी शहर हादरले असून, शनिवारी पोलीस ठाण्याबाहेर नातेवाईक आणि स्थानिकांनी गर्दी करून न्यायाची मागणी केली. तरुणांच्या सुरक्षेसाठी कडक पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे. तरुण पोराला गमावल्याने सुहासचे कुटुंब शोकाकुल असून, तपासाला वेग देण्याची मागणी करण्यात आली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## माता व बाल...

केले जाईल, असा इशारा देण्यात आला होता.

या पाठपुराव्यानंतर अखेर जिल्हा नियोजन समितीकडून खालीलप्रमाणे निधी मंजूर करण्यात आला-फर्निचर : ९८ लाख ५ हजार

सिलिंग काम : ४९ लाख ५ हजार

ऑक्सिजन प्लांट ते इमारत पाईपलाईन : २५ लाख

एकूण - १ कोटी ७३ लाख (पावणे २ कोटी रुपये)

## माजी मंत्री जयदत्त...

आहे. यावेळी भीम आर्मीचे महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष सुनील गायकवाड म्हणाले की, आपण या लोकांना आधार दिला आणि केव्हाही आपल्या या निराधार केंद्रास मदत करू. निराधार लोकांना आधार देण्याचे काम राजू वंजारे यांच्या माध्यमातून होत आहे ही आम्हाला अभिमानास्पद गोष्ट आहे सामाजिक काम करत असताना निस्वार्थीपणे आपण हे काम करत आहोत याची समाजाने जाणीव ठेवली पाहिजे आणि आपणास वेळोवेळी मदत केली पाहिजे अशी भावना व्यक्त केली. याप्रसंगी अॅड.राहुल मस्के यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## महापरिनिर्वाणदिन....

केले. उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या दूरदृष्टीपूर्ण कार्याचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा वारसा पुढे नेण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मोरे प्रतिक्षा यांनी केले तर केले तर आभारप्रदर्शन महाविद्यालयातील प्रा. डॉ. आशा कांबळे यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि भावपूर्ण वातावरणात पार पडला.

## कापसाला किमान...

एकीकडे निसर्ग कहर मांडत आहे तर दुसरीकडे शेतकऱ्याच्या पिकाला भाव मिळत नाही. शेतकऱ्याने तरी काय करावे असा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांच्या कापसाला किमान १० हजार रुपये व सोयाबीन ला ६ हजार प्रति क्विंटल हमी भाव देण्यात यावा. शेतकऱ्यांची सीसीआय कडून पिळवणूक होत आहे. शेतकरी अडाणी आहे, त्याच्या अडाणी पणामुळे ऑनलिन बुकिंग अवघड झाले आहे. सीसीआय कडून शेतकऱ्याची मोठी पिळवणूक होते आहे. ती तत्काळ थांबवण्यात यावी, या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची जनजागृतीस संत तुकाराम बाबा महाराज यांच्या पुण्यभूमी पारगाव जप्ती येथून सुरूवात करण्यात आली. ही मोहीम जिल्ह्यासह राज्यात सुरू करण्यात येणार असून उसापेक्षाही तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी दिला आहे. सरकारने हमीभावात भरघोस वाढ करून शेतकऱ्यांना परवडेल असा भाव देण्याची गरज असताना केवळ भावनिक विषयाला धरून सरकार राजकारण करत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे शेतकरी देशोधडीला लागणार असून शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाला योग्य तो हमीभाव मिळाला पाहिजे. या वेळी शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, नवनाथ तिपाले, गणेश तिपाले, शहदेव तिपाले, अरुण तिपाले, महेंद्र तिपाले, मिठू तिपाले, वैजनाथ तिपाले, नामदेव तिपाले, राजेंद्र तिपाले, महेंद्र तिपाले, रवी तिपाले, बबन धुरंदरे, अरुण कदम आदी शेतकरी उपस्थित होते.

## केकानवाडी शिवारात...

दराडे व बप्पासाहेब शेषराव भांगे राहणार वडवणी जी. बीड या दोघांना मुद्देमाला सह ताब्यात घेतले असून यांच्याविरुद्ध पो. हे. काँ जमीर अलाउद्दीन शेख यांच्या तक्रारी वरून गुन्हा दाखल करण्यात आला असून गुरा न न ४४७/ २०२५ कलम ६५ (ई), ८३ महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अनन्बे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांचे मार्गदर्शना खाली पो. हे. काँ. पवार हे करत आहेत

## सोलापूर-धुळे....

हे चोरटे पसार होत आहेत. अशा घटना वारंवार समोर येऊ लागल्याने आता पोलिस अधिक्षक नवनित कावत यांनी गेवराई, बीड ग्रामीण, नेकनूर पोलिसांना विशेष सूचना देत या मार्गावरील गस्त वाढवण्याबरोबरच उपाययोजना करण्याचे आदेश दिले. धूम स्टाईल चोरी सोलापूर-धुळे महामार्गावर चोरी करणारे चोरटे हे दुचाकीचा वापर करत आहेत. एका गाडीवर तिघेजण बसलेले असतात, मध्ये बसलेला चोर ट्रॅव्हल्सच्या जवळ येताच उभा राहतो आणि पाठीमागील शिडीचा आधार घेऊन त्यावर चढतो, त्यानंतर हाताला येतील त्या बॅग खाली टाकून गाडीची गती कमी होण्याची प्रतीक्षा करतो, गाडीची गती कमी होताच खाली उतरुन पसार होतो. तर दुसरीकडे त्याचे साथीदार खाली फेकल्या गेलेल्या बॅग घेऊन पसार होतात. महामार्गावरील विश्रांती ठरू शकते धोकादायक सोलापूर ते धुळे महामार्गावर अनेक हॉटेल्स ढाबे आहेत, अशा हॉटेल्सपासून काही अंतरावर लोक विश्रांतीसाठी थांबतात. चालकाला झोप आली असेल तर महामार्गाच्या बाजूला काही वेळ गाडी थांबवून झोपही घेतली जाते, अशा गाड्यांनाच हे चोरटे लक्ष्य करत आहेत. त्यामुळे महामार्गावर अशा पद्धतीने थांबणे धोकादायक ठरु शकते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# संतोष बादाडे यांचा सामाजिक उपक्रम, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**बीड । प्रतिनिधी**

समाजाप्रती कृतज्ञता आणि संवेदनशीलता जोपासणारा आदर्शवत उपक्रम राबवत संतोष लहूराव बादाडे यांनी यंदाही आपला वाढदिवस सेवाभावी पद्धतीने साजरा केला. रविवारी, ७ डिसेंबर रोजी पांगरी रोडवरील रुक्माई गोविंद मतिमंद निवासी विद्यालयात विद्यार्थ्यांना नाश्ता तसेच शालेय साहित्य वाटप करून वाढदिवसाचे औचित्य साधण्यात आले. सकाळच्या प्रसन्न वातावरणात विद्यार्थ्यांनी नाश्ता घेतला आणि त्यानंतर वह्या, पेन, पेन्सिल, ड्रॉइंग मटेरियल आदी साहित्य मिळताच त्यांच्या निष्पाप चेहऱ्यावर आनंदाने खुललेली स्मितररेषा पाहता



कार्यक्रमाचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे जाणवत होते. मुलांचे भारावलेले चेहरे, उत्साह आणि कृतज्ञ नजरा पाहून उपस्थितांनाही आनंदाचा मोठा अनुभव मिळाला. उपक्रमाची सुरुवात श्री क्षेत्र नवगण राजूरी येथील गणपतीच्या महाआरतीने करण्यात आली. आध्यात्मिक वातावरणात झालेल्या आरतीनंतर बादाडे यांनी आपल्या आयुष्यातील खास दिवस चांगल्या कार्याने साजरा करण्याचा संकल्प पुन्हा अधोरेखित केला. या उपक्रमाला रामचंद्र मुंडे, सनी गुंजाळ, ऋषिकेश देवकुळ, अशंका खांडे, सागर घोडके, महादेव डोंगरे, बाप्पा गायकवाड, भैया बादाडे, कैफ तसेच मित्रपरिवारातील अनेक तरुण मोठ्या उत्साहात आणि स्वखुशीने उपस्थित होते. सर्वांनी मिळून साहित्य वाटपात सहभाग घेतल्याने कार्यक्रमाला सामाजिक ऐक्याचे विशेष भावनिक रंग लाभले. मागील अनेक वर्षांपासून संतोष बादाडे वाढदिवसाची पारंपरिक धामधूम टाळून विविध सामाजिक, शैक्षणिक आणि मानवतावादी उपक्रमांतून समाजाला काहीतरी देण्याचा प्रयत्न करतात. कधी गरीब विद्यार्थ्यांना मदत, कधी आरोग्यविषयक उपक्रम, तर कधी गरजू कुटुंबांना सहाय्य-त्यांच्या या संवेदनशील कार्यपद्धतीचे सर्वत्र कौतुक होते. समाजातील वंचित घटकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याची त्यांची ही परंपरा प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मकता निर्माण होऊन इतरांनाही सामाजिक जवाबदारी जपण्याची प्रेरणा मिळते, हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## धम्मदीप बुद्ध विहार येथे ०६ डिसेंबर महापरीनिर्वान दिनानिमित्त कॅण्डल मार्च कडून अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

धम्मदीप बुद्ध विहार शिवाजीनगर बीड येथे महामानाव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरीनिर्वान दीना निम्मित दिलीप नगर ते धम्मदीप बुद्ध विहार पर्यंत कॅण्डल मार्च रॅली काढून अभिवादन करण्यात आले त्या वेळी ड तेजस वडमारे, राजू धनवे, निवृत्त वाघमारे,अंजली वडमारे, सरिता खेमाडे, शिवकन्या खेमाडे, वर्षा खेमाडे, अर्चना जाधव, प्रीती जाधव कोमल वाघमारे, उर्मिला वडमारे, किरण वडमारे, सांची वडमारे, आशा धनवे, पंचफुला वाघमारे, संगीता जाधव, सविता डोळस, आशाबाई भालेराव, सुधा सोनवणे,शारदा वाघमारे, हौसाबाई वाघमारे, जान्हवी वाघमारे,उषा जाधव, रांणी साळवेतसेच बालक, बालिका व बलभीम नगर पालवण रोड परिसरातील सर्व बांधव सहपरिवार उपस्थित होते..



## महाडीबीटी अनुदान अडकलं कुठे ? ; अनिलदादा जगताप यांचा जिल्हाधिकाऱ्यांना सवाल

**बीड । प्रतिनिधी**



बीड मतदारसंघातील महाडीबीटी अंतर्गत लॉटरी पद्धतीने पूर्वसंमती मिळालेल्या शेतकऱ्यांना अनुदान तात्काळ वितरीत करण्यात यावे, अशी ठोस मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. लॉटरी प्रक्रियेत निवड झाल्यानंतर अनेक लाभार्थी शेतकऱ्यांनी आवश्यक ती खरेदी पूर्ण केली आहे. मात्र सहा-सहा महिने उलटूनही अनुदानाची रक्कम खात्यात जमा होत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाच्या योजनेत पात्र ठरूनही निधी न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी असून तात्काळ निर्णयाची अपेक्षा आहे. पूर्वसंमती मिळालेल्या शेतकऱ्यांचे अनुदान तत्काळ मंजूर करून त्यांच्या खात्यात जमा करावे, जेणेकरून शेतकरी बांधवांवर अन्याय होणार नाही. असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

# शांताई अर्बनतर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

शांताई अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीतर्फे महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्यस्मरणाचा कार्यक्रम उत्स्फूर्तपणे साजरा करण्यात आला. संविधान शिल्पकार आणि सामाजिक समतेचे महामानव असलेल्या डॉ. आंबेडकरांना या वेळी विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे डॉ.प्रसाद ठोकरे, प्रकाश वाघमारे बँकेचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे, उपाध्यक्ष संदीप वाघमारे, घाडगे सर ,जोशी सर तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांनी बाबासाहेबांच्या समाजपरिवर्तनातील योगदानाची उजळणी करत त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले. शांताई अर्बन ही संस्था केवळ आर्थिक



सेवा देणारी संस्था नसून सामाजिक उत्तरदायित्व जपणारी अग्रगण्य वित्तीय संस्था म्हणून ओळखली जाते. आर्थिक साक्षरता अभियान, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, आरोग्यविषयक उपक्रम, तसेच गरजू नागरिकांना आवश्यक त्या क्षेत्रांत सहाय्य अशा अनेक सामाजिक उपक्रमांत शांताई अर्बन सातत्याने अग्रणी भूमिका बजावत आहे. ग्राहक-केंद्रित सेवा, पारदर्शक व्यवहार आणि समाजहिताची बांधिलकी ही शांताई अर्बनची वैशिष्ट्ये असल्याचे अध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे यांनी यावेळी सांगितले. महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने डॉ. आंबेडकरांचे विचार समाजात रुजवण्याचा आणि समाजोपयोगी कार्याच्या माध्यमातून त्यांची प्रेरणा जिवंत ठेवण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयांमध्ये अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

येथील आनंद मागासव्य शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख एस.बी. मेश्राम यांनी केले. यावेळी शाळेचे माजी शिक्षक विजय देशमुख यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यु.बी. पवळ आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस.वाघमारे यांनी केले. याप्रसंगी बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थिनी, आनंद छात्रलयाचे अधिक्षक डी.व्ही.खरसाडे, या विद्यालयाचे शिक्षक आर.बी. घुले, एस.बी.मेश्राम, पवळ यु.बी., श्रीमती एन.जी.मुंडे, सय्यद ए.एन.आणि शिक्षकेतर कर्मचारी एस.एस.गायकवाड यांची उपस्थिती होती.

## बीड शहरातील मोकाट कुत्र्यांचा न. प. ने त्वरित बंदोबस्त करावा: सोमेश कदम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात मोकाट कुत्र्यांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत असून शाळेत जाणारी मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच रात्री प्रवास करणारे नागरिक असुरक्षित झाले आहेत. शहरातील मुख्य बाजारपेठा, वसाहती आणि सार्वजनिक ठिकाणी कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.विशेषतः सकाळी शाळेत जाणाऱ्या मुलींना आणि महिलांना या कुत्र्यांमुळे त्रास सहन करावा लागत असल्याचे अनेक नागरिकांनी सांगितले आहे. काही भागात तर कुत्र्यांच्या हल्ल्याच्या घटना समोर आल्याने चिंतेत भर



पडली आहे. या पार्श्वभूमीवर नगरपरिषद प्रशासनाने त्वरित भटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सोमेश कदम यांनी नगरपरिषदेला लेखी निवेदनाद्वारे केली आहे.कदम यांनी सांगितले की, शहराचा विस्तार वाढला असला तरी मूलभूत सुविधा आणि नागरी सुरक्षेकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कुत्र्यांचा बंदोबस्त करणे अत्यावश्यक आहे. नागरिकांकडूनही प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत अशी मागणी होत आहे.

## संस्कारमध्ये महामानव डॉ.आंबेडकरांना अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय आणि समतेचे पुरस्कर्ते, वंचित शोषितांच्या न्याय हक्कासाठी लढा देऊन जगाला मानवतेचा संदेश देणारे, प्रज्ञासूर्य, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन स्मृतीस महापरिनिर्वाण दिनानिमित्त संस्कार विद्यालयातील पहिली /दुसरी विभागात विनम्र अभिवादन करण्यात आले. या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . याप्रसंगी व्यासपीठावर संस्कार विद्यालयाच्या मु.अ. श्रीमती कुलकर्णी एस.डी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या वक्त्या म्हणून श्रीमती खवले व्ही .एम. व श्रीमती वाघ पी.पी. यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा, संघर्षाचा, समाज बांधवाबद्दल असलेल्या तळमळीचे , अभ्यासातील त्यांची असलेली आवड, भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये त्यांचा असलेला सिंहाचा वाटा अशा अनेक गोष्टींवर प्रकाश टाकून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची थोरवी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. तसेच याकार्यक्रमाचे संचलन श्रीमती काळे ए.एस. यांनी करून कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न केला. यावेळी विभागातील सर्व सहकारी शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## के.एस.पी.विद्यालय येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

के.एस.पी. विद्यालय, बीड येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुण्यस्मरण निमित्त अभिवादन देण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन कार्यक्रमास सुरवात केली. या कार्यक्रमामध्ये मुलांना बाबासाहेबांच्या समाज कार्या विषयी धडे देण्यात आले. उपस्थितीत मान्यवरांनी आपल्या भाषनामध्ये सांगितले की, डॉ. आंबेडकरांच्या वारशाला आदरांजली म्हणून महापरिनिर्वाण दिनाचे महत्त्व आहे. हा दिवस जाती-आधारित भेदभाव नष्ट करण्यासाठी आणि सामाजिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या अथक प्रयत्नांची आठवण करून देतो. न्याय्य



आणि समावेशक समाज निर्माण करण्यासाठी त्यांच्या शिकवणी आणि वचनबद्धतेवर चिंतन करण्याची ही एक संधी आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जे जो पिईल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, तसेच स्वतः वर विश्वास ठेवा, इतिहासाला विसरू नका, आणि हक्कासाठी संघर्ष करा हे त्यांचे प्रेरणादायी विचार आहेत. या विचारांमधून शिक्षण, स्वाभिमान, इतिहास आणि हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा मिळते. यावेळी मुलांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती सौ.अंजलीताई शेळके, श्री. ऋषिकेशजी शेळके, (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख), शाळेचे प्रा. मुख्याध्यापक विशाल सुपेकर, तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम संपन्न झाला.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव गणपूर ता.जि.बीड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीदिनी फळ वाटप करण्यात आले. यावेळ उपस्थित संस्थेचे सचिव तेजस पवार, सहसचिव रोहन डोळस,सदस्य तसेच गावकरी होते.*

## कल्याण वाल्हेकर यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

**आष्टी । प्रतिनिधी**



मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी यांच्या वतीने प्रथमच विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना 'जिजाऊ माँसाहेब आदर्श राज्यस्तरीय पुरस्कार' देऊन गौरविण्यात येणार आहे. यावर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कार शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयातील सहशिक्षक कल्याण वाल्हेकर यांना जाहीर करण्यात आल्याची माहिती आयोजन समितीचे अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे यांनी दिली. विद्यार्थी प्रिय शिक्षक श्री वाल्हेकर सर यांना यापूर्वीही राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाले आहेत.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिक्षण महर्षी मा. आमदार भीमराव धोंडे साहेब संस्थेचे सचिव डॉक्टर अजयदादा धोंडे, अभय राजे धोंडे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी बी राऊत ,डॉ. शिवदास विधाते, माऊली बोडखे ,संजय शेंडे, पंडित विद्यालयाचे प्राचार्य सुरेश बोडके विद्यालयातील सर्व शिक्षक वर्ग यासह हाजीपुर चे मा. सरपंच विठ्ठल राख, सर्व ग्रामस्थ व माजी विद्यार्थी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.


बीड तालुका

**समता महिला बचत गट सदस्यांची सहकारी पतसंस्था (म.)**

**नोंदणी क्रमांक : बीएचआर /(बीएचआर)/ बीएनके/४०१/२००८ दिनांक २९.०९.२००८**

**कार्यालय : व्दारा समता प्रतिष्ठान, १-२-२७, लोकायत, ऑफिसर्स कॉलनी, धानोरा रोड, बीड.**

**(फक्त सभासदांसाठी)**

**विशेष सर्वसाधारण सभेची नोटिस**

बीड तालुका समता महिला बचत गट सदस्यांची सहकारी पतसंस्थेच्या सर्व सन्माननिय सभासदांना कळविण्यात येते कि,संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक २५ डिसेंबर २०२५, गुरुवार रोजी दु. १.०० वाजता संस्थेच्या अध्यक्षा मा. अयोध्या नामदेव टपले यांच्या अध्यक्षतेखाली औटी मंगल कार्यालय, जालना रोड, बीड येथे आयोजीत केली आहे. कृपया संस्थेच्या सर्व सभासदांनी वरील ठिकाणी वेळेवर उपस्थित राहुन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

● सभेपुढील विषय :-
१. सुधारित आदर्श उपविधीस मान्यता देणे.

(स्वाक्षरीत)
छाया नितीन गवळी
सचिव

संचालक मंडळाचे आदेशावरुन

● सुचना:- १. सभासदांस काही प्रश्न अथवा सुचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्यांचे प्रश्न / सुचना सही व नावानिशी दिनांक २३/१२/२०२५ पर्यंत पाठवावे. नंतर आलेल्या प्रश्नांचा व सुचनांचा विचार केला जाणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

● गणपूर्ती:-ठरलेल्या वेळी सभेस गणपुर्ती नाही झाली तर तिच सभा त्या ठिकाणी अर्ध्या तासानंतर कार्यक्रम पत्रिकेनुसार घेण्यात यईल. त्यास गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.


# ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांना जिजाऊ माँसाहेब आदर्श संपादक पुरस्कार जाहिर

**आष्टी । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद आष्टी यांच्या वतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना जिजाऊ माँसाहेब आदर्श संपादक पुरस्कार प्रदान केला जातो. यावर्षीचा हा मानाचा पुरस्कार आष्टी येथील संपादक तथा ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांना जाहीर झाला असल्याची

माहिती ज्येष्ठ पत्रकार सीताराम पोकळे यांनी दिली. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण



३५ वर्षाच्या आणि प्रभावी कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. उत्तम बोडखे यांच्या निवडीबद्दल आष्टी तालुका पत्रकार संघ, सुप्रभात ग्रुप व मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले आहे.

उत्तम बोडखे यांना मागील काही वर्षांत त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल विविध संस्थांच्या माध्यमातून अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल अनेक मान्यवरांकडून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

उत्तम बोडखे हे आलेल्या संकटांवर मात करुन यशस्वी झाले आहेत ते यशस्वी होण्याचे मुख्य कारण जर कोणते असेल तर जात,धर्म,पंथ यांच्या पलीकडे जावून सर्व समाजातील मित्र परिवारास केलेली मदत होय. आपण एका दैनिकाचे उपसंपादक म्हणून कधीच वागले नाहीत.एक मित्र म्हणून आपण सर्वांशी चांगले संबंध प्रस्थापित केलेले आहेत. उत्तमराव हे उपप्राचार्य अनंत हंबर्डे यांचे लाडके विद्यार्थी.हंबर्डे सरांनी त्यांना घडविले. उत्तम बोडखे महाविद्यालयीन जीवनापासून बातम्या,लेख लिहिण्यात इंटरेस्टफुल असायचे.लेख, बातम्यांच्या निमित्ताने राजकीय मंडळींशी त्यांची उठबस वाढली. कॉलेज जीवनापासूनच 'वार्ताहर' पदाची त्यांना आवड असल्यामुळे ते त्यांनी स्वीकारले.पुढे बी.जे. ही वृत्तपत्रशास्त्र पदवी संपादन केल्यानंतर 'आष्टी वार्ताहर' हे साप्ताहिक त्यांनी सुरू केले.ते एक शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे घरची परिस्थिति साधारणच होती. परंतु त्यांच्या अंगी असलेला गुण म्हणजे जिद्द व चिकाटी,मेहनत करण्याची तयारी यामुळे त्यांनी खऱ्या अर्थाने शून्यातून विश्व निर्माण केले.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. ०८ डिसेंबर २०२५ ● पान ४

# माता व बाल संगोपन रुग्णालयाला पावणेदोन कोटींचा निधी मंजूर

## पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार ; सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यास यश : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा रुग्णालय परिसरात २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मंजूर झालेले १०० खाटांचे माता व बाल संगोपन रुग्णालय तब्बल २१ कोटी खर्चून २०२३ मध्ये पूर्ण झाले. मात्र गेली दोन वर्षे निधीअभावी लिफ्ट ,फर्निचर, सिलिंग आणि ऑक्सिजन पाईपलाईनची कामे रखडली असल्याने ही इमारत धुळखात पडून होती.





सदर प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख व बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे महाराष्ट्र राज्य प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २ वर्षांपासून सतत निवेदने, आंदोलनाद्वारे हा विषय सातत्याने पुढे आणला होता. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांना निवेदन देत, निधी तातडीने उपलब्ध न झाल्यास 'पालकमंत्री अजितदादा के नाम पे देदे बाबा' लक्ष्यवेधी भिक मागो आंदोलन ▶▶ उर्वरित पान २ वर

**● पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार**

**बीड जिल्हा रुग्णालयाची सध्याची क्षमता ३२० खाटांची आहे, तर प्रत्यक्षात रुग्णसंख्या ४५० च्या घरात असते. प्रसूती व प्रसूती-पश्चात विभागात क्षमतेपेक्षा जास्त रुग्ण असल्याने गर्भवती महिलांना अनेकदा खाट उपलब्ध होत नाही. या परिस्थितीत १०० खाटांच्या स्वतंत्र माता-बाल रुग्णालयामुळे महिलांना आणि बालकांना स्वतंत्र, सुरक्षित व सुसज्ज उपचारसुविधा मिळणार आहेत. फर्निचर व सिलिंग कामांसाठी पावणे दोन कोटींचा निधी मंजूर केल्याबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांचे मन:पूर्वक आभार असल्याचे डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी म्हटले आहे.**

## थोडक्यात...

### तरुणाच्या डोळ्यात चटणी फेकून, चोरट्यांनी सोन्याची चैन, अंगठ्या असा २ लाख २० हजार रुपयाचा ऐवज पळविला



**परळी । प्रतिनिधी**

धारावती तांडा रोडवर जिम करून येणाऱ्या तरुणाच्या गाडीला धडक देऊन चाकूचा धाक दाखवून डोळ्यात चटणी टाकून २ लाख २० हजार रुपयाचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी ४ जणांविरुद्ध परळी ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. चोरट्यांकडून झालेल्या या चोरीच्या घटनेमुळे परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. धारावती तांडा येथील यशवंत प्रेमदास पवार हे ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ७.३० वाजता व्यायाम करून परळीवरून धारावती तांड्याकडे मोटारसायकलवरून जात असताना, काळरात्री देवी मंदिर रोडवर एका बंद धाब्यासमोर दोन मोटारसायकलवरून आलेल्या चार चोरट्यांनी त्यांचा पाठलाग करत अचानक धडक दिली. तोंडाला मास्क लावून आलेल्यांपैकी एकाने चाकू दाखवून धमकावले, तर दुसऱ्याने त्यांच्या डोळ्यात चटणी टाकून त्यांना धरून ठेवले. त्याच्या गळ्यातील साडेतीन तोळ्यांची सोन्याची चैन आणि एक तोळ्याच्या दोन अंगठ्या हिसकावून चोरटे फरार झाले. साडेतीन तोळ्यांची १,४०,००० रुपये किंमतीची सोन्याची चैन, ८०,००० रुपये किंमतीच्या दोन सोन्याच्या अंगठ्या असे एकूण २,२०,००० रुपये किमतीचे साहित्य लुटून घेऊन पसार झाले. यशवंत प्रेमदास पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चार अनोळखी आरोपींवर इछड २०२३ कलम ३०९(ब), २८१, १२६(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परळी ग्रामीण पोलीस निरीक्षक मजहर सय्यद हे तपास करीत आहेत. आरोपींच्या तपासासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

### गेवराईत पवार-पंडित गटात झालेल्या राडाप्रकरणी १७ जणांना अटक व सुटका

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई नगर पालिका मतदानाच्या दिवशी गेवराईत पवार- पंडित गटात झालेल्या राडाप्रकरणी दाखल केलेल्या गुन्ह्यात पोलिसांनी भाजप नेते बाळराजे पवार, त्यांचे पुत्र शिवराज पवार या दोघांसह एकूण १७ जणांना अटक केली. सर्वांना नोटीस देऊन सोडण्यात आले. सोमवारी या सर्वांना अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्यासमोर हजर केले जाणार असल्याची माहिती मिळाली आहे. त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करुन सर्वांकडून मोठ्या रकमेचे बंधपत्र लिहून घेतले जाणार आहे. पुन्हा गुन्हा केल्यास हे बंधपत्र रद्द होऊन त्या रकमेचा दंड होईल असे सांगण्यात आले. गेवराई शहरात नगर पालिका मतदानादरम्यान मतदान केंद्र क्रमांक १० वर पृथ्वीराज पंडित व शिवराज पवार यांच्यात झालेल्या राड्याचे रुपांतर मोठ्या प्रकरणात झाले.या राड्यानंतर बाळराजे पवार आपल्या सहकाऱ्यांसह थेट माजी आमदार अमरसिंह पंडितांच्या कृष्णाई निवास्थानी धडकले होते. तिथे त्यांनी पंडितांचे पीए अमृत डावकर यांना मारहाण झाली होती. यानंतर जयसिंह पंडित व पृथ्वीराज पंडित हे आपल्या कार्यकर्त्यांसह बाळराजे पवार यांच्या घरावर धावून गेले होते असा आरोप आहे.तिथे माजी आ. लक्ष्मण पवार व जयसिंह पंडित एकमेकांवर धावून गेले. कार्यकर्त्यांनी दगडफेक करुनजीप फोडली होती. यामुळे तणाव निर्माण झाला होता. दरम्यान, या प्रकरणात दोन्ही गटांकडून पोलिसांत तक्रार दिली गेली नव्हती. त्यामुळे पोलिसांनी स्युमोटो दखल घेऊन दोन्ही गटांकडील सुमारे ५० जणांविरोधात गुन्हा नोंद केला होता. या प्रकरणात आता पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली आहे.

### मस्साजोगमधील युवतीने रहिमतपूरमध्ये जीवन संपवले



**कोरेगाव । प्रतिनिधी**

रहिमतपूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील क्वार्टरमध्ये राहणाऱ्या तेजस्विनी रामहरी तांदळे (२३) या युवतीने बेडरूममधील खिडकीच्या गजाला ओढणी बांधून गळफास घेत आत्महत्या केली. तेजस्विनी मूळची मस्साजोग (ता. केज, जि. बीड) येथील आहे. तिच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. याप्रकरणी रहिमतपूर प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सहायक म्हणून कार्यरत असणारे तिचे वडील रामहरी (मूळ रा. मस्साजोग) यांनी रहिमतपूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. रहिमतपूर प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सहायक म्हणून कार्यरत असणारे रामहरी नागनाथ तांदळे हे मुळचे बीड जिल्ह्यातील कोरेगाव (पो. मस्साजोग) येथील आहेत. ते पत्नी सुवर्णा तांदळे व जर्नालिझम केलेली मुलगी तेजस्विनी असे एकत्रीत रहिमतपूरच्या आरोग्य केंद्रातील क्वार्टरमध्ये राहात आहेत. शुक्रवारी रात्री तिघे जेवण करून झोपले. पहाटे ४ वाजता पाण्याची मोटार सुरू करावयाची असल्याने त्यांनी बेडरूममध्ये झोपलेल्या तेजस्विनीला आवाज दिला. त्यावेळी लाईट नसल्याने पुन्हा तेही झोपले. त्यानंतर सकाळी ६ वाजता दरवाजा वाजवला, मोबाईल फोनवरती फोन केला मात्र तेजस्विनीने फोन उचलला नाही. वारंवार फोन करूनही तेजस्विनी फोन उचलत नसल्याने घाबरून बेडरूमचा दरवाजा तोडला. बेडरूममध्ये प्रवेश केला तेव्हा पाहिले असता तेजस्विनी हिने खिडकीच्या गजाला ओढणी बांधुन गळफास घेतल्याचे दिसले. आरोग्य केंद्राचे डॉ. महेश बोले यांना घटनेची माहिती देण्यात आली. मृत तेजस्विनीचे शवविच्छेदन केल्यानंतर तिचा मृतदेह मूळ गावी मस्साजोग, जि. बीड येथे नेण्यात आला. तपास हवालदार जयवंतराव पवार करत आहेत.

## माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवस निमित्त अन्नदान व फळ वाटप कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील जिव्हाळा बेघर केंद्रामध्ये माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त गरजू निराधार लोकांना अन्नदान व फळे वाटप करण्यात आले.

या निमित्ताने कॅनडा देशातील रहिवासी प्रेरित काझी (आर्किटेक्ट )हे उपस्थित होते. तसेच प्रमुख अतिथी म्हणून त्यांच्या समवेत मुंबई येथील भीम आर्मीचे महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष सुनील



गायकवाड तसेच सामाजिक कार्यकर्ते ॲड.राहुल मस्के, शशांक सोनवणे विजय गायकवाड, आदींच्या उपस्थितीमध्ये गरजू, बेघर, निराधार लोकांना सामाजिक कार्यकर्ते अशोक शेजवळ यांच्या माध्यमातून अन्नदान व फळे वाटप करण्यात आले यावेळी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी बोलताना प्रेरित काझी म्हणाले की, आपले हे काम अत्यंत मोलाचे आहे आपल्या कामास आम्ही केव्हाही मदत करण्यास तयार आहोत. निराधार लोकांचा आधार बनने ही फार मोठी गोष्ट ▶▶ उर्वरित पान २ वर

## महापरिनिर्वाणदिन साजरा

**केज । प्रतिनिधी**

डॉ. विश्वनाथराव कराड अध्यापक महाविद्यालय, केज तसेच संत भगवान बाबा एम. एड कॉलेज, केज यांच्या संयुक्त विद्यमाने महापरिनिर्वाण दिन अतिशय श्रद्धाभावाने आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. या निमित्त महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग तसेच महाविद्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले तसेच त्यांच्या कार्याचा आजच्या समाजजीवनाशी असलेला संबंध उलगडण्यात आला. प्रारंभी प्राचार्य डॉ. गौतम गायकवाड यांनी महापरिनिर्वाण दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. डॉ.बाबासाहेबांनी दिलेल्या संविधान, मानवाधिकार, समता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांचे पालन करणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर विद्यार्थ्यांनी विचारगीत, भाषणे आणि प्रबोधनपर प्रस्तुती सादर करून डॉ. बाबासाहेबांच्या योगदानाचे स्मरण ▶▶ उर्वरित पान २ वर

## कापसाला किमान 10 हजार भाव द्या : राजेंद्र आमटे

### सीसीआय कडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक थांबवा



**बीड । प्रतिनिधी**

संत तुकाराम बाबा महाराज यांची पुण्यभूमी पारगाव जप्ती येथून कापूस आंदोलन जागृती बैठकीस सुरवात झाली असून शेतकऱ्याच्या कापसाला किमान १० हजार रुपये भाव देण्यात यावा, शेतकऱ्यांची कापूस खरेदी केंद्रावर सीसीआय कडून होणारी पिळवणूक तत्काळ थांबवण्यात यावी या मागणीसाठी बीड येथे मोठे शेतकरी आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाची पहिली बैठक पारगाव जप्ती येथे झाली असून आंदोलनाची मशाल पेटणार असल्याचे दिसत आहे. शेतकऱ्यांना वाली राहिला नाही. ▶▶ उर्वरित पान २ वर

## केकानवाडी शिवारात विनापरवाना दारू विक्री, दोघांना पकडले



**बीड । प्रतिनिधी**

केकानवाडी शिवारात विनापरवाना दारू विक्री करताना दोघांना पोलिसांनी पकडले. स्टेशन हद्दीमध्ये आसरडोह आडस रस्त्यावर केकानवाडी शिवारामध्ये दिव्या गार्डन समोर विनापरवाना देशी विदेशी दारूची विक्री करताना धारूर पोलिसांनी दोन जणांना पकडून मुद्देमाल व एक दुचाकी गाडी ताब्यात घेतली व दोन आरोपींना ताब्यात घेऊन बिना परवाना देशी विदेशी दारू विक्री चा गुन्हा दाखल करून पुढील तपास धारूर पोलीस करत आहे. धारूर पोलिसांनी आसरडोह ते आडस रोडवर केकानवाडी शिवारात दिव्या गार्डन अँड रेस्टॉरंट समोर देशी व विदेशी दारू व बियर बार च्या बाटल्या विनापरवाना आर्थिक लाभाच्या दृष्टीने विकणाऱ्या दोन जणांना २२ हजार ५० रुपयाच्या दारूच्या मुद्देमालासह व ११०००० रुपये किंमतीच्या काळ्या रंगाच्या होंडा कंपनीची युनिकॉर्न गाडी गाडी क्रमांक ४४ ए डी ००३३ सह एकूण १३२०५० रुपयाचा मुद्देमाला सह आरोपी संजयकुमार आप्पाराव ▶▶ उर्वरित पान २ वर

## सोलापूर-धुळे महामार्गावर चोरट्यांची दहशत

**बीड । प्रतिनिधी**

सोलापूर धुळे महामार्गावर गेवराई ते चौसाळा या दरम्यान चोरट्यांची दहशत निर्माण झाली आहे. जेवणासाठी, चहापाणासाठी थांबलेल्या ट्रॅव्हल्सवर चढून बॅग लंपास केल्या जात आहेत. तर रात्री विश्रांतीसाठी रस्त्याच्या बाजूला हॉटेलचा आधार घेवून थांबलेल्या प्रवाशांना शत्राचा धाक दाखवून लुटले जात आहे. असे प्रकार थांबवण्यासाठी आता पोलिस दल अलर्ट मोडवर आले असून गेवराई, बीड ग्रामीण व नेकनूर पोलिसांना पोलिस



अधीक्षकांनी विशेष सूचना दिल्या आहेत. बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या सोलापूर-धुळे महामार्गावर गेल्या काही महिन्यांमध्ये लुटमार तसेच ट्रॅव्हल्सवरील बॅग लंपास केल्या जात असल्याच्या घटना घडत आहेत. दोन दिवसांपूर्वी गेवराई पोलिस ठाण्याच्या हद्दीत गढीनजीक परप्रांतीय प्रवाशांच्या थांबलेल्या गाडीतील महिलांचे दागिने चोरट्यांनी लंपास केले होते. तसेच पालीजवळ असलेल्या एका हॉटेलच्या पार्किंगमध्ये गाडी उभा केल्यानंतर मालकाने ती लॉक केली नव्हती, नेमकी ही संधी साधत चोरट्यांनी गाडीतील बॅग लंपास केली होती. याबरोबरच ट्रॅव्हल्स चहापाणासाठी अथवा जेवणासाठी रात्री एखाद्या हॉटेलवर थांबल्यानंतर त्यावर चोरटे चढून बसत आहेत. गाडी काही अंतरावर जाताच प्रवाशांच्या बॅग खाली फे कल्या जातात, चढावर अथवा टोलनाक्यावर गाडीची गती कमी होताच ▶▶ उर्वरित पान २ वर



*पाणी फाउंडेशन आयोजित गट शेती प्रीमियर लीग २०२५ सन्मान सोहळा पार पडला त्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा, श्री दत्ता बारगजे तसेच प्रमुख पाहुणे मा, श्री वीवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड व विशेष उपस्थिती जिल्हा कृषी अधिकारी बीड चे मा, श्री, सुभाष जी साळवे व संतोष शिंगारे विभागीय समन्वयक पाणी फाउंडेशन व सर्व पाणी फाउंडेशन टीम २०२५ मध्ये काम केलेल्या सर्व गटांचे कलेक्टर साहेब यांच्या हस्ते सन्मान सोहळा कार्यक्रम पार पडला याप्रसंगी गुगळादेवी नैसर्गिक शेतकरी गट ईट येथील अध्यक्ष रामप्रसाद डोईफोडे यांना सन्मानचिन्ह व पारितोषिक देऊन कलेक्टर साहेब यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.*

## पोराने बापाच्या डोक्यात घातली कुऱ्हाड, सुदैवाने ती दांड्यातून निखळली अन् बापाचा जीव वाचला

**बीड । प्रतिनिधी**

बापाने दारू का पिला असे विचारताच?, पोटच्या पोराने रागाने आपल्या बापाला कुऱ्हाडीने डाव्या हातावर वार केला. मात्र दुसरा वार डोक्यात करीत असताना सुदैवाने कुऱ्हाड दांड्यातून निखळून खाली पडल्याने बापाचा जीव वाचला.



केज पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या धारूर तालुक्यातील गांजपूर येथील भारत तुकाराम धोंगडे यांचा मुलगा नितीन धोंगडे याला दारु पिण्याची सवय आहे. दि.५ डिसेंबर रोजी सायंकाळी ७:३० वा.चे. सुमारास तो दारु पिऊन घरी आला. म्हणून त्याचे वडील भारत धोंगडे यांनी तु दारु पिऊन का आलास? असे विचारले म्हणून त्याला राग आला आणि नितीन धोंगडे यांनी त्याच्या वडिलांना शिवीगाळ करुन कुऱ्हाडीने डाव्या हातावर वार करुन जखमी केले. नितीन धोंगडे हा त्याच्या बापाच्या डोक्यात कुऱ्हाडीचा दुसरा वार घालीत असताना अचानक दांड्यामधून कुऱ्हाड निघून पडली आणि सुदैवाने त्यांच्या डोक्यात कुऱ्हाडी ऐवजी दांडा लागल्याने पुढील अनर्थ टळला. मात्र दांडा डोक्यात लागल्याने त्यांचे डोके फुटले आणि ते खाली पडले.

भारत धोंगडे यांच्यावर प्राथमिक आरोग्य केंद्र युसुफवडगाव येथे प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी त्यांना स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय येथे उपचार करण्यात आले. भारत धोंगडे यांच्या तक्रारीवरून नितीन धोंगडे याच्या विरुद्ध युसुफवडगाव पोलिस ठाण्यात गु. र. नं. ३०५/२०२५ भा. न्या. सं. ११५(३), ११८(१), ३५१(२), ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कॉन्स्टेबल केशव खाडे हे तपास करीत आहेत.